CR 200111 2515
36

क्र./सीआर १०९८/भू-३/२००१,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य)यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
विधानभवनासमोर,पुणे -४११ ००१.
दिनांक :- /११/२००१.
23 NOV 2001

विषय :- न्यायालयीन फी मुद्रांकच्या दरामध्ये बदल.

परिपत्रक

मुंबई न्यायालयीन फी अधिनियम १९५९ चे संदर्भात महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३०/२००१, दि.२८/९/२००१ अन्वये (महाराष्ट्र राजपत्र असधारण २८ सप्टेंबर २००१ पृष्ठ क्र.७३८ व ७३९) विभागाकडे प्राप्त होणा-या विविध प्रकारचे अर्जास न्यायालयीन फी (कोर्ट फी स्टॅम्प),दि.१/१०/२००१ पासून सुधारित दर लागू करणेत आलेले आहेत. त्याची अंमलबजावणी विभागामधील सर्व अधिनस्त कार्यालयामधून अंमलात आणली गेली असावी. अशी इकडील धारणा आहे. ती पृष्ठांकित करणेत यावी. वाढीव दर खालीलप्रमाणे असे.

| अ.नं. | अर्जाचा प्रकार | न्यायालयीन फी मुद्रांक चे सुधारीत दर (रुपये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | नक्कलेसाठी | ५(पाच) |
| २. | शोध घेणेसाठी | ५(पाच) |
| ३. | मोजणी/तक्रार/फेरफार नोंदीसाठी | ५(पाच) |
| ४. | मुखत्यार/वकीलपत्र | १०(दहा) |
| ५. | अपील/फेरतपासणी/पुनर्विलोकन अर्ज | ५०(पन्नास) |

दि.१/१०/२००१ पासुन सुधारित दर लागू करणेत आले असून त्यानुसार आपले कार्यालयांत व आपले अधिनस्त कार्यालयांत जरुर ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.या सुधारणेबाबतच्या सुचना जनतेच्या माहितीसाठी सर्व कार्यालयांचे सुचना फलकावर लावणेत याव्यात.

(स्वाक्षरी/-डॉ.सुधीरकुमार गोयल)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य)

प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख,सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत/- अधीक्षक भूमि अभिलेख सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी

२/- आपले अधिनस्त तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी सर्व यांना दयावयाच्या जादा प्रतीसह.

आपले अधिनस्त कार्यालयांस परिपत्रकांच्या प्रती पुरवून तसे इकडे ज्ञात करावे.

प्रत/-उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण) (भूमापन) (नागरी भूमापन) (एकत्रीकरण ),यांना माहितीसाठी.

प्रत/- कार्यालय अधीक्षक (सर्व)जमाबंदी आयुक्त कार्यालय,पुणे यांना माहितीसाठी.